# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २५९-२२** **दिनांक २२/०८/२०२२**

## ऑटो रिक्षा चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणुन १,९५,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ११/०८/२०२२ रोजी तक्रारदार श्री. हुजेफा तालीफअकील बावनगाववाले, वय ५१ वर्षे यांनी त्यांची बजाज कंपनीची ऑटो रिक्षा कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या संमतीशिवाय लबाडीने चोरी केल्याबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२८२/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

माणिकपुर पोलीस ठाणे हददीत ऑटो रिक्षा चोरी व इतर वाहन चोरींच्या गुन्हयांच्या प्रमाणात दिवसेदिवस वाढ होत असल्याने सदर वाहन चोरी गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल वाहन चोरींचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांकडून वांरवार सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयांच्या घटनास्थंळाना भेटी देवून तांत्रिक माहितीचे अवलोकन करुन त्याअनुषंगाने आरोपी नामे १) इम्तियाज सय्येद उस्मान अली सय्येद कादरी, वय ५० वर्षे, धंदा- रिक्षाचालक, रा. ठाकुरपाडा, मुंब्रा, जि. ठाणे व २) आमीर आयुब शेख ऊर्फ बल्ले, वय २५ वर्षे, धंदा- रिक्षाचालक, रा. जिवनबाग, इसाक चाळ, मुंब्रा, जि. ठाणे यांना मुंब्रा, जि. ठाणे परीसरामध्ये सापळा लावून ताब्यात घेवून दिनांक १५/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान त्यांच्याकडुन रु. १,९५,०००/- किंमतीच्या एकूण ४ ऑटो रिक्षा हस्तगत करुन एकूण ४ ऑटो चोरी गुन्हयांची उकल करण्यात आली आहे.

**उघडकीस आणण्यात आलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. १९४/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २८२/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. |
| ३. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.क्र. ३४०/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. |
| ४. | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | गु.र.क्र. ३५७/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. |

सदरची कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण व पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.


माणिकपूर पोलिस ठाणे
अंतर्गत
नवीन सनसिटी पोलिस चौकी
बीट क्र ०२ - बीट क्र ०३.